IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
Special Issue : Volume -9 : Issue-1 (March-2023)
ISSN 2455-4375

# राजर्षी शाहू महाराज यांचे शेती व उद्योग विषयक धोरण

**डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम**
सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग)
सेठ केसरीमल पोरवाल कला आणि
विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
कामठी, जि. नागपूर - 441001
भ्रमणध्वनी क्रमांक - 9970779085
Email Id. - siddhmeshram@gmail.com

---

**प्रस्तावना :-**

रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या रयतेच्या उन्नतीसाठी सहकार, सामाजिक, कृषी, उद्योग, आदी विविध क्षेत्रांत भरीव कार्य केले. त्याच्या कर्तृत्वाशी त्याचे कार्य जोडलेले असते. या कार्यावरील त्याची नितांत असलेली निष्ठा त्याची प्रेरणा होऊ शकते. त्या प्रेरणेतून जे कार्य जन्म घेते, ते कार्य उजळते, प्रकाशमान होते. ॥कर्मण्येवाधिकारस्ते॥ हा भारतीय तत्त्वज्ञानाचा उद्घोष आहे. कर्म हा माणसाचा अधिकार आहे. तोच ज्यावेळी ध्यास होतो, तेव्हा निखळ परिणाम त्यामधून प्रतित होतात. महाराजांवर युरोप खंडातल्या 18 व्या आणि 19 व्या शतकात झालेल्या झालेल्या राजकीय आर्थिक आणि सामाजिक बदलांचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता. आपल्या युरोपमधील भेटीत त्यांनी तेथील समाज जीवनाचे अध्ययन केले होते. त्यांनी आपल्या संस्थानात सामाजिक व आर्थिक बदल घडून आणण्याचे ठरविले. शाहू महाराजांच्या काळातील भारतीय समाज अशिक्षित, अज्ञानी,परंपरा व रूढीवादी होता. तसेच आर्थिक सामाजिक दृष्ट्या तो अत्यंत मागासलेला होता. अशा समाजाच्या उत्थानाचे बहुमोल कार्य शाहू महाराजांनी केले. बहुजनांचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास करणारा हा आदर्श राजा होता. महात्मा ज्योतिबा फुले यांची परंपरा पुढे चालविणारा तो लोकराजा होता. आपल्या 28 वर्षांच्या कालावधीत त्यांनी जे कार्य व सुधारणा केल्यात त्या पाहून कोणीही विस्मय चकित होईल. राजर्षी शाहू महाराजांनी जे अफाट कार्य केले ते दोन भागात स्पष्ट करता येईल. एक आर्थिक स्वरूपाचे कार्य, या कार्यात शेती, उद्योग, व्यापारात सुधारणा, दुष्काळ निवारणार्थ उपाय, रोजगार निर्मिती, मूलभूत सुविधाचा विकास, कामगार चळवळीच्या बाबत केलेले कार्य, शिक्षणाचा प्रसार, वेठबिगार उच्चाटन इत्यादी कार्य अंतर्भूत होतील.तर दुसऱ्या प्रकारच्या सामाजिक कार्यात अस्पृश्यता निवारण, भटक्या जाती व जमातीच्या विकासाची केलेली उपाययोजना, स्त्रियांची उन्नती व्हावी म्हणून केलेले प्रयत्न, वस्तीगृहाची स्थापना, आरक्षणाची उपायोजना, कलाकारांना दिलेले प्रोत्साहन, कुस्त्याचा व व्यायामाचा प्रसार इत्यादी विविध कार्याचा समावेश करता येईल. प्रस्तुत पेपरमध्ये शेती व उद्योग या दोन मूलभूत क्षेत्रात त्यांनी केलेल्या

कार्याचा विचार करण्यात आला आहे. खरे पाहिले तर त्यांच्या प्रत्येक विचारांचा व कार्याचा स्वतंत्रपणे सविस्तर परामर्श घेतला पाहिजे.

**संशोधन पेपरची उद्दिष्टे :-**

1. शाहू महाराजाच्या शेती व उद्योग विषयक विचाराचा मागोवा घेणे.

2. शाहू महाराजाची कल्याणकारी भूमिका स्पष्ट करणे.

शाहू महाराजाचे शेती व उद्योग विषयक धोरण समजून घेतांना त्यातील विविध बाबींचा विचार करणे अगत्याचे ठरते.

**शेती विषयक सुधारणा :-**

विकसित समाजव्यवस्था निर्माण होण्यासाठी शेतीचा विकास कारणीभूत ठरला, हा मानवी संस्कृतीचा इतिहास आहे. भारतात सतराव्या शतकात ईस्ट इंडीया कंपनी आणि इतरही अनेक परदेशी व्यापारी आले. त्यातून आधुनिक जीवनशैलीचा परिचय घडू लागला, सोबतच शोषण व्यवस्था दृढ होऊ लागली. त्यांच्या कालखंडात राज्यकर्त्यांनी कर गोळा करावा आणि संरक्षण आणि आपल्या राज्य हद्दीतील अंतर्गत कायदा, सुव्यवस्था पाहावी एवढीच मर्यादित कार्ये राज्यकर्ते आपली मानीत. प्रजेचे आर्थिक जीवनमान सुधारावे असे त्यांच्या कार्यप्रणालीत नव्हते. आर्थिक क्षेत्रात प्रजेने ज्याचे त्याने पाहावे, असे त्यांचे धोरण असे. त्यांना प्रगतिपथावर नेणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या भक्कम करून सुखी करणे हे त्यांच्या खिजगणतीत नव्हते. जो समर्थ असेल तो टिकेल, दुबळा असेल तो मरेल, ही अर्थनीती होती. सरळ धोपटमार्गाने याच पद्धतीने सारा राज्यकारभार चाले. अशावेळी शाहू छत्रपतींनी या नीतीला छेद देऊन समाजातील सर्व घटकांचा विचार मनात ठसविला होता. यामध्ये शेती आणि शेतकरी यांचाही विचार त्यांच्या केंद्रस्थानी होता.

ब्रिटिश साम्राज्याने एकोणिसाव्या शतकात भारतामध्ये सर्वदूर हातपाय पसरले तेव्हा भारतीय शेतमालाच्या लुटीबद्दल महात्मा फुले, दादाभाई नौरोजी यांनी आवाज उठविला. पुढल्या काळात विविध संस्थानिकांनी कष्टकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणण्यासाठी प्रयत्न केले. कष्टकरी, शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्यांत राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अग्रणी होते. त्याचाच परिणाम म्हणून एकविसाव्या शतकापर्यंत जी सामाजिक आंदोलने झाली, त्यावर त्यांच्या विधायक विचारांचा व कार्याचा प्रभावही जाणवतो.

शेती हा ग्रामीण जीवनाचाच नाही तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा कणा आहे, हे महाराजांना माहीत होते. शेतकऱ्याचे अज्ञान, भांडवलाचा अभाव, जमिनीचा छोटा आकार, शेतमाल विक्रीतील अडचणी इत्यादीची त्यांना कल्पना होती. शेती आणि शेतकरी यांच्याबद्दलची त्यांची आस्था कमालीची संवेदनशील होती. आपला सारा देशच शेतीप्रधान आहे. महाराजांचे राज्यही शेतीप्रधान आहे, पण शेतकरी मात्र

नाडलेला, अडलेल्या अवस्थेत जगतो आहे हे एक सत्य होते. म्हणून त्यांच्या क्षमतासुद्धा मर्यादित होत्या. कोल्हापूर संस्थानाची त्यावेळची लोकसंख्या आठ ते नऊ लाखांच्या दरम्यान होती, महाराजांच्या कारकीर्दीत शेती हाच प्रमुख व्यवसाय होता, परंतु शेतीचे लहान-लहान तुकड्यांत विभाजन झाले होते. कुटुंबांतील वाटणी व्यवहारामुळे ते अटळच मानले जात होते. अशा काळात, तुकड्यांची व्यवस्था बदलून त्याचे रुपांतर मोठ्या शेतीमध्ये व्हावे म्हणजे शेती व्यवसाय किफायतशीर होईल, असे शाहू महाराजांचे मत होते  हे मत त्यांनी बोलून दाखविले आणि तशी कृतीही केली. माणगावच्या परिषदेमध्ये भाषण करताना महाराज म्हणतात, “तुम्ही साधारण माणसी दहा एकर जमीन वाट्याला येईल असे तुमच्या म्हारकीचे (महारवतन जमिनींचे) तुकडे करा आणि हे उत्पन्न तुमच्यातील वडील असणाऱ्या व्यक्तीकडे चालवायला द्या. म्हणजे सर्वांना अर्धपोटी राहावे लागते ते वाचेल ” महाराजांनी आपले मत केवळ भाषणापुरते मर्यादित न ठेवता तशी कृती केली. त्यासाठी त्यांनी १९१३ ला ‘अविभाज्य इनामाचा कायदा’ केला. त्यानुसार इनाम अथवा वतनी जमिनींची वाटणी करता येणार नाही, असे ठरविले.शेतीच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून असतो याची पुरेपूर जाणीव असल्याने शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात शेतीकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. दुष्काळ, गुरांचे आजार, अल्प उत्पादन यांकडे लक्ष पुरवून शाहू महाराजांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाच्या योजना धोरणपूर्वक राबविल्या. राज्यकारभार स्वीकारानंतर छ. शाहू महाराजांनी सर्वप्रथम शेतकयांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांचे प्रश्न समजून घेतले. शेतीच्या दुरावस्थेमुळे शेतकऱ्यांचे दारिद्र्य वाढून त्यांचे जीवनमान खालावते याची जाणीव झाल्याने शेतीची उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न शाहू महाराजांनी सुरू केले. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्र आत्मसात केले पाहिजे, ही जाणीव कृतीत आणण्यासाठी छ. शाहू महाराजांनी १९१२ मध्ये कोल्हापूर येथे ‘किंग एडवर्ड ॲग्रिकल्चर इन्स्टिट्यूट’ स्थापन केली. या संस्थेमार्फत सुधारीत बी-बियाणे, खते, पशुपालन यांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू लागली. अद्ययावत शेती अवजारांचे प्रदर्शन भरवून शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक मिळू लागले. शिवाय आधुनिक शेती उपकरणांचे संग्रहालय सुद्धा शाहू महाराजांच्या प्रयत्नांतून निर्माण झाले.

**उद्योग विषयक सुधारणा :-**

शेतकऱ्यांनी वनौषधी आणि इमारती लाकडाची लागवड केल्यास त्यांचे उत्पन्न वाढू शकेल, हे ध्यानात आल्याने महाराजांनी साग, हिरडा, बेहडा, आंबा, फणस, काजू व इतर वनौषधींची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. साबुदाणा तयार होणाऱ्या टॅपिओकाची शेती करण्यासाठी विशेष प्रोत्साहन महाराजांनी दिले. पारंपरिक पिकांशिवाय नवी पिके घेण्याचा उपक्रम त्यांनी यशस्वीपणे राबविला. पन्हाळा व भुदरगड येथे चहा आणि कॉफीची लागवड करण्याचा प्रयोग केला. शिवाय वेलदोडे, कोको, रबर, ताग, अंबाडी, बटाटे, लाख, ट्रॅपिओका, कंबोडीयन कापूस, आदींची लागवड म्हणजे महाराजांच्या प्रयोगशीलतेचे आणि प्रगतिशीलतेचे द्योतक होय. उद्योग निर्माणामध्ये ते अग्रेसर ठरले. कोल्हापूरची शाहू मिल हे त्याचे मोठ उदाहरण आहे. येथे पहिल्यांदा सूत आणि नंतर कापड निर्मिती सुरू

झाली. इचलकरंजी, कोल्हापूर, शिरोळ, चिंचली, गडहिंग्लज अशा ठिकाणी जिनिंग फॅक्टरी सुरू झाल्या. शेतकऱ्यांनी नगदी पिकाकडे वळले पाहिजे असे शाहू महाराजांना वाटत असल्यामुळे त्यांनी पन्हाळा येथे चहा, कॉफी, रबर याचे खास मळे तयार केले, सोबतच बटाटे, कापूस, ताग, रेशीम यासारखी पिके घेण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त केले. चहा उत्पादनाचा प्रयोग डोंगराळ भागातील हवामानाची साथ लाभल्यामुळे मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाला. 'पन्हाळा चहा नं. ४' या नावाने नवीन ब्रँड प्रसिद्ध झाला. महाराजांच्या निधनानंतर हा ब्रँड बंद पडला हे खरे, पण चहासारख्या नगदी पिकांकडे शेतकऱ्यांना वळविण्यासाठी महाराजांनी आखलेले धोरण महत्त्वपूर्ण होते.

**कृषी बाजारपेठ :-**

कृषी मालाची विक्री योग्य प्रकारे व्हावी व शेतमालाला योग्य किंमत मिळावी म्हणून विक्री संघटना काढण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. सहकारी कारखाने, दुकाने, पतपेढ्या काढा , त्यास  हवी तेवढी मदत मी करेन असे महाराज सांगत होते. लोकश्रमावर महाराजांचा यावेळी भर होता. 1912 साली सहकारी कायदा त्यांनी संमत केला. शेतमालासंबंधी व्यापार वाढावा म्हणूनही त्यांनी सहाय्य केले. कोल्हापुरात गुळाची बाजारपेठ निर्माण केली. जयसिंगपूर येथे मोठी व्यापारपेठ स्थापन केली. शेती क्षेत्राशी संबंधित एक बाब म्हणजे दुष्काळ होय. त्यांच्या कारकिर्दीत पाच वेळा दुष्काळ पडलेत. त्यांनी केलेले उपाय असे होते.

- स्वस्त धान्याची दुकाने सुरू केलीत.
- शेजारच्या महसूल संस्थानातून तांदूळ आणला.
- सरकारी खर्चाने विहिरी खोदल्यात व दुरुस्त केल्यात.
- रस्ते बांधलेत.
- भूकबळी होऊ नये म्हणून अन्न छात्रालय सुरू केली.
- म्हातारे, पांगळे, आंधळे इत्यादीसाठी दरबार तर्फे शिधावाटप केले.
- ज्यांना जनावरे पोसने शक्य नसेल त्यांनी जनावरे संस्थानाकडे पाठवावीत नंतर घेऊन जावीत असे आदेश काढलेत. जनावरांना पुरेसा चारा मिळावा म्हणून जंगले खुली केलीत.
- धरणे बांधणे पूल बांधणे इत्यादी दीर्घकालीन योजना आखल्यात आणि त्यामधून रोजगार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून दिला.

**वनकायदा व पतधोरण :-**

शेतकऱ्यांना जाचक ठरणाऱ्या वनकायदा आणि पतधोरणात शाहू महाराजांनी तातडीने बदल करून शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. शेतकरी सावकारांकडून कर्ज घेत असल्याने आणि अव्वाच्या सव्वा व्याज देत असल्याने शेतकरी नाडला जातो, म्हणून शाहू महाराजांनी १८९५ मध्ये शेतकऱ्यांना दरबारामार्फत कर्जपुरवठा करण्यास सुरुवात केली. १ जून १८९९ रोजी वटहुकूम प्रसृत करून

सावकारांवर अनेक निर्बंध आणले, त्यानुसार शेतकऱ्याच्या शेतातील उभी पिके जप्त करण्यावर बंदी लागू झाली. शिवाय व्हिक्टोरिया राणीच्या स्मरणार्थ एक निधी स्थापून, सावकारांनी शेतकऱ्यांच्या जप्त केलेल्या जमिनी सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यास सुरुवात केली. त्यांनी सर्वांसाठी एक महत्त्वाचा संदेशही दिला. ते म्हणत, 'कृषी कर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वत:ला सुख तर होतेच, शिवाय सर्व मनुष्य जातीलाही सुख मिळते. कृषी कर्म करताना क्षात्र धर्माला बाधा येते ही समजूत निखालस खोटी आहे. ज्यावर माणूस समाजाची सुव्यवस्था आणि उन्नती अवलंबून आहे, ते कर्म कमीपणाचे आहे ही समजूत वेडगळपणाची आहे. हे असे कर्म करणारा माणूस समाज खऱ्या अर्थाने क्षत्रिय होय. अन्न माणसाला जगविते, त्याचे पालनपोषण करते, त्याला बलवानही करते आणि इतरांनाही जगवा असा संदेश देते. श्रमाची प्रतिष्ठा जगात फारच मोठी आहे. शेती ही श्रमाची प्रतिष्ठाच आहे. शेती पाण्याखाली येणे अगत्याचे, म्हणून त्यांनी नव्या विहिरी, तलाव, बंधारे, कालवे काढायला प्रोत्साहन दिले.

**सिंचन धोरण : -**

शाहू महाराजांच्या जलनीतीची आजही दिमाखात उभी असलेली साक्ष म्हणजे राधानगरी धरण होय. शेती सिंचनाखाली आणल्याशिवाय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार नाही, याची स्पष्ट कल्पना असल्यामुळे महाराजांनी पाणी वापराबाबत योग्य धोरण ठरविले. शेती पाण्याखाली आणण्यासाठी नव्या विहिरी, तलाव, बंधारे आणि कालवे बांधण्यास सुरुवात केली. राधानगरी धरण उभारण्यातून महाराजांची दूरदृष्टी दिसते. या धरणाला शंभरपेक्षा जास्त वर्षे होऊनही त्याचे बांधकाम उत्कृष्ट आहे. १९०९ मध्ये राधानगरी धरण प्रकल्प हाती घेण्यात आला. १९१८ पर्यंत या धरणाच्या कार्यासाठी शाहू महाराजांनी १४ लाख रुपये खर्च केले. परंतु महाराजांच्या कारकीर्दीत हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही पुढे राजाराम महाराजांनी हा प्रकल्प पूर्ण करून राजर्षी शाहू महाराजांचे स्वप्न पूर्ण केले.

महाराष्ट्रातील इतर भागाप्रमाणे कोल्हापूर विभागातही दुष्काळच्या झळा सोसाव्या लागत. त्यामुळे दुष्काळ निर्मूलनासोबतच भविष्यकालीन पाणी नियोजनाचे धोरण शाहू महाराजांनी राबविले. भूजलातून पाणी उपसा न करता नदी, तलावांतील पाणी वापरण्यावर त्यांचा भर होता. जमिनीवर पडणारे पावसाचे पाणी वाहून न जाता योग्य प्रकारे साठविले तरच भविष्यातील दुष्काळाला तोंड देता येणे शक्य आहे, याची पुरेशी कल्पना असल्याने राजर्षी शाहू महाराजांनी नवीन सार्वजनिक तळी बांधण्याची मोहीम हाती घेतली, तसेच अस्तित्वात असलेल्या तलावांची दुरुस्ती केली. याशिवाय दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी पाटबंधारे खाते निर्माण करून 'इरिगेशन ऑफिसर'ची नेमणूक केली. या पाटबंधारे खात्यामार्फत प्रत्येक गावाची तपशीलवार पाहणी करून १९०२ मध्ये पाटबंधारे धोरण जाहीर केले. यासंबंधी ३ फेब्रुवारी १९०२ रोजी महाराजांच्या आज्ञेनुसार प्रसृत झालेला 'जाहीरनामा नंबर ४८' मुळातून वाचण्यासारखा आहे. 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथा'त हा जाहीरनामा वाचता येतो. इरिगेशन ऑफिसर म्हणून शंकर सीताराम गुप्ते यांची नेमणूक करताना त्यांनी व त्यांच्या कर्मचारीवर्गाने गावागावांत सर्वेक्षणाचे काम कसे करावे, याच्या सूचना आजही मार्गदर्शक ठराव्यात अशा आहेत.

**समारोप :-**

राजर्षी शाहू महाराजांचे शेती व उद्योग विषयक विचार आणि त्यांची त्यांनी केलेली अंमलबजावणी अभ्यासल्यास त्यांच्या विचाराची व कृतीची यथार्थता आजही पटते. शासनाने शेती क्षेत्रात विकासासाठी अधिक गुंतवण करण्याची आवश्यकता आहे. विशेषता शेतीला जलसिंचन करण्याची शासनाची जबाबदारी आहे. त्यात कोणताही प्रादेशिक हिताचा मुद्दा डोळ्यासमोर ठेवून चालणार नाही. राज्यातील देशातील सर्व शेतकऱ्यांचे हित जोपासण्याची आवश्यकता त्याद्वारे अधोरेखित झाली आहे. सध्याच्या दुष्काळाच्या स्थितीवर मात करण्यासाठी त्यांनी अमलात आणलेल्या उपाययोजना सर्वकाळी अमलात आणता येतील इतक्या ताज्या व दमदार आहेत.

**संदर्भ :-**


- जहागिरदार दि.व्य.(2005), आर्थिक जगत सेंटर फॉर एकॉनोमिक अॅन्ड सोशल स्टडीज गुलमोहर कॉलनी ,अमरावती
- म्होपरे राहुल श.(2022), राजर्षी शाहू महाराजांचे औद्योगिक व व्यापार विकास धोरण, अर्थमिमांसा, खंड -14, अंक -2, विदर्भ अर्थशास्त्र परिषद, ISSN-2320-0197
- कटारे दुष्यंत मनोहर (2018), लोकराजा राजर्षी , युगप्रवर्तक प्रकाशन ,लातूर, ISBN-978-81-937477-1-1
- करपे आर .एन. ( 2012), राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ, चिन्मय प्रकाशन , औरंगाबाद, ISBN-978-93-81948-28-6
- लोकराज्य (2018), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय ,महाराष्ट्र शासन ,मुंबई ,वर्ष -70 वे ,अंक -3